# The Civil Jails Act, 1874
(BOMBAY II OF 1874)

# दिवाणी तुरुंगांबाबत अधिनियम, १८७४

अनुक्रमणिका

पृष्ठ

प्रस्तावना [रद्द केली.] २९५

विभाग १ आणि २

कलमें

१ ते ७. [रद्द केली.] २९५

विभाग ३

दिवाणी तुरुंग

८. [रद्द केलें.] ... ... ... ... ... ... ... २९५

९. दिवाणी तुरुंग प्रत्येक जिल्हा न्यायालय असेल त्या ठिकाणीं असावा आणि त्याची इतर ठिकाणीं स्थापना करण्याचा अधिकार आहे. २९५

१०. जिल्हा न्यायालयाचा नाझीर हा दिवाणी तुरुंगाचा रक्षक असेल, आणि त्याच्या हाताखालील सेवकवर्ग असेल. २९५

११. न्यायाधिशानें दिवाणी तुरुंगाची पाहणी करणें ... ... ... ... २९६

१२. वैद्यकीय अधिकाऱ्यानें तुरुंगांत हजर राहणें ... ... ... ... २९६

राज्य सरकारच्या खर्चानें औषधोपचार करणें ... ... ... ... २९६

१३. बाहेरच्या इसमांना दिवाणी तुरुंगांत प्रवेश देण्याचा अधिकार आहे ... ... २९६

१४. दिवाणी तुरुंगांतील कैद्यांचें खाणेंपिणें ... ... ... ... ... २९६

१५. दिवाणी तुरुंगांत मृत्यु पावणाऱ्या कैद्याच्या शवाची व्यवस्था लावणें ... ... २९७

१६. कैद्याच्या मृत्युसमयीं किंवा त्यास मुक्त करतेंवेळीं शिल्लक राहिलेल्या भत्त्याची विल्हेवाट लावणें. २९७

शवांची व्यवस्था लावण्याच्या खर्चाची आणि दिवाणी तुरुंगाशी संबंधित असलेल्या इतर खर्चाचा तरतूद राज्य सरकारनें करणें. २९७

विभाग ४ ते १४

१७ ते ५२. [रद्द केलीं.] ... ... ... ... ... ... ... २९७

# सन १८७४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २*

# दिवाणी तुरुंगांबाबत अधिनियम, १८७४

[१५ जानेवारी १८७५]

हा अधिनियम पुढील अधिनियमान्वयें अंशत : रद्द करण्यांत आला :—

सन १८९४ चा अधिनियम ९.

सन १८८६ चा मुंबई अधिनियम ३.

तो पुढील अधिनियमान्वयें सुधारण्यांत आला :—

सन १८८२ चा मुंबई अधिनियम २.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम २३.

त्यांत पुढील आदेशान्वयें अनुकूलन १ रुपभेद करण्यांत आले. भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश.

भारतीय विधि अनुकूलन आदेश, १९५०.

बृहन्मुंबई खेरीजकरून मुंबई राज्यांतील तुरुंगांचें नियमन करण्याबाबत आणि तेथें शिस्त ठेवण्यांत येईल अशी व्यवस्था अंमलांत आणण्याबाबत अधिनियम.

[सन १८९४ चा अधिनियम ९ अन्वयें रद्द करण्यांत आलें.] प्रस्तावना.

## विभाग १ आणि २

## प्रारंभिकः तुरुंगांचे प्रकार

१. ते ७. [हीं कलमें सन १८९४ चा अधिनियम ९ अन्वयें रद्द करण्यांत आलीं.] प्रारंभिक.

## विभाग ३

## दिवाणी तुरुंग

८. हा अधिनियम बृहन्मुंबई बाहेरील मुंबई राज्यांतील दिवाणी तुरुंगांना लागू असेल. लागू असणें.

९. सन १८६९ चा अधिनियम १४, याच्या कलम ३ अन्वयें किंवा राज्याच्या कोणत्याहि भागांत त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि तत्सम विधीन्वयें बनविलेल्या प्रत्येक जिल्ह्याचे, ज्या ठिकाणीं जिल्हा न्यायालय असेल तेथें दिवाणी तुरुंग असला पाहिजे ; परंतु इतर सोईच्या ठिकाणीं दिवाणी तुरुंग स्थापन करणें हें राज्य सरकारच्या अधिकारांत असेल. दिवाणी तुरुंग प्रत्येक जिल्हा न्यायालय असेल त्या ठिकाणीं असावा, आणि त्याची इतर ठिकाणीं स्थापना करण्याचा अधिकार आहे.

१०. जिल्हा न्यायालयाचा किंवा दिवाणी तुरुंग ज्या ठिकाणीं असेल त्या ठिकाणच्या मुख्य दिवाणी न्यायालयाचा नाझीर (किंवा कोणत्याहि नांवानें उल्लेखिला जाणारा तत्सम अधिकारी, ज्याचा ह्यांत पुढे "नाझीर" असा उल्लेख केला आहे) हा, त्या दिवाणी तुरुंगाचा पदासिद्ध रक्षक असेल, आणि तो कैद्यांना सुरक्षित अभिरक्षेंत ठेवण्यास आणि तुरुंगांची आणि कैद्यांची स्वच्छता राखण्यास आणि त्यांना चांगल्या स्थितींत ठेवण्यास, जबाबदार असला पाहिजे, आणि राज्य सरकारची मंजुरी घेऊन जिल्हा न्यायालय फर्मावील असा सेवकवर्ग त्याच्या हाताखालीं असेल. जिल्हा न्यायालयाचा नाझीर हा दिवाणी तुरुंगाचा रक्षक असेल, आणि त्याच्या हाताखाली सेवकवर्ग असेल.

---

*दिनांक १५ नोव्हेंबर १९५९ पर्यंत सुधारलेला.

न्यायाधिशानें दिवाणी तुरुंगाची पहाणी करणें.

११. ज्या जिल्हयांत दिवाणी तुरुंग असेल त्या जिल्हयाच्या न्यायाधिशानें किंवा सहाय्यक न्यायाधिशानें प्रत्येक महिन्यांत निदान एकदां तरी अशा दिवाणी तुरुंगाची पहाणी केली पाहिजे, आणि त्यानें, तुरुंगाच्या व्यवस्थेबाबत आणि कैद्यांचा चांगला बंदोबस्त ठेवण्याबाबत, त्यांच्या आरोग्याबाबत आणि त्यांच्या जागेच्या सोईबाबत त्यास योग्य वाटतील असे लेखी आदेश दिले पाहिजेत.

त्यानें तुरुंगाची ज्या तारखेस पाहणी केली असेल ती तारीख व त्यानें जे अभिप्राय लिहीणें असतील ते, त्या कारणाकरितां ठेवलेल्या पुस्तकांत नमूद केलें पाहिजेत.

वैद्यकीय अधिकाऱ्यानें तुरुंगांत हजर राहाणें.

१२. राज्य सरकारनें नेमावयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यानें तुरुंगांत हजर राहीलें पाहिजे, आणि तो, तुरुंगांत स्वच्छता ठेवण्याच्या संबंधानें आणि कैद्यांच्या आरोग्यरक्षणासंबंधानें त्यास इष्ट वाटेल असा सल्ला, जिल्हा न्यायाधिशास किंवा दिवाणी तुरुंग ज्याच्या ताब्यांत असेल अशा इतर अधिकाऱ्यास देण्यास बंधनकारक असेल.

राज्य सरकारच्या खर्चानें औषधोपचार करणें.

तसेंच त्यानें, राज्य सरकारच्या खर्चानें आजाऱ्यांना औषधोपचार केले पाहिजेत. परंतु ह्या कलमांतील कोणत्याहि मजकुरामुळें, दिवाणी तुरुंगांतील कैद्यास, त्यास योग्य वाटेल त्या कोणत्याहि वैद्यकीय इसमास सल्लामसलतीकरितां नियुक्त करण्यास प्रतिबंध होतो असें समजतां कामा नये.

बाहेरच्या इसमांना दिवाणी तुरुंगांत प्रवेश देण्याचा अधिकार आहे.

१३. कैद्यांना भेटूं इच्छिणाऱ्या बाहेरच्या इसमांकरितां दिवाणी तुरुंग सकाळीं ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत खुला ठेवला पाहिजे, आणि जिल्हा न्यायाधिशाच्या किंवा सहाय्यक न्यायाधिशाच्या परवानगीवांचून, किंवा वैद्यकीय अधिकाऱ्याच्या शिफारशीअन्वयें, तुरुंग ताब्यांत असणाऱ्या नाझरनें दिलेल्या परवानगीवांचून, बाहेरच्या कोणत्याहि इसमास, उपरिनिर्दिष्ट वेळेपेक्षां अधिक वेळ दिवाणी तुरुंगांत राहाण्याची परवानगी देतां कामा नये.

दिवाणी तुरुंगांतील कैद्यांचें खाणेंपिणें.

१४. (१) दिवाणी तुरुंगांतील कैद्यांना त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था स्वतः करण्याचा किंवा ज्या न्यायालयानें त्यांना तुरुंगवासाची शिक्षा दिलेली असेल त्या न्यायालयानें, त्यांच्याकरितां खाण्यापिण्यासाठी जो पैसा किंवा भत्ता ठरविलेला असेल त्यांतून, अन्नपाणी आणि इतर आवश्यक गोष्टी, ज्या पक्षकाराच्या दाव्याअन्वयें त्यांना अटकावून ठेवलें असेल त्यानें दिलेल्या भत्याच्या रकमेपर्यंत पुरविण्याबद्दल, नाझरला फर्माविण्याचा अधिकार आहे :

परंतु कैफ आणणाऱ्या दारुचा किंवा औषधिद्रव्यांचा अतिरिक्त उपयोग करण्यास प्रतिबंध केला पाहिजे. जिल्हा न्यायाधिशानें दर महिन्याच्या पहिल्या तारखेस मान्य केलेल्या किंमतींची यादी, प्रत्येक दिवाणी तुरुंगांत ठेवली पाहिजे आणि ती सर्व कैद्यांना मिळण्याजोगी असली पाहिजे.

(२) जो दिवाणी कैदी त्याच्या स्वतःकरितां पुरेसे कपडे आणि अंथरुण-पांघरुण मिळविण्यास असमर्थ असेल त्यास, जे कपडे आणि अंथरुण-पांघरुण पुरविण्याबाबत न्यायाधीश किंवा सहाय्यक-न्यायाधीश आदेश देईल ते कपडे आणि अंथरुण-पांघरुण नाझरनें पुरविलें पाहिजे.

कोणत्याहि अशा कैद्यास, खाजगी इसमाच्या वतीनें दिलेल्या हुकुमनाम्याची अंमलबजावणी करून तुरुंगवासाची शिक्षा दिलेली असेल तेव्हां, असा इसम किंवा त्याचा प्रतिनिधी, त्या कैद्यास अशा प्रकारें पुरविलेल्या कपड्यांबद्दल आणि अंथरुण-पांघरुणाबद्दल झालेला खर्च, नाझरानें लेखी मागणी केली असतां, देण्यास पात्र असेल; आणि असा खर्च देण्यांत कसूर केली तर, कैद्यास मुक्त केलें पाहिजे.

१५. दिवाणी तुरुंगांत कैदी मृत्यु पावेल तेव्हां नाझरानें, अशा मृत्युचें प्रतिवृत्त ताबडतोब जवळच्या न्यायाधिशाकडें केलें पाहिजे, न्यायाधिशानें त्यानंतर, अशा मृत्युबाबत चौकशी करून त्याचें लेखी प्रतिवृत्त कारामहानिरीक्षकाकडें केलें पाहिजे, आणि कलम १२ अन्वयें नेमलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यानें त्या कैद्याच्या मृत्युबाबत प्रमाणपत्र दिल्यानंतर, अशा कैद्याचें शव, त्याच्या नातेवाईकांच्या किंवा मित्रांच्या ताब्यांत (जर कोणतेहि हजर असतील आणि त्याचा ताबा घेण्यास तयार असतील तर), दिलें पाहिजे. दिवाणी तुरुंगांत मृत्यु पावणाऱ्या कैद्याच्या शवाची व्यवस्था लावणें.

तुरुंगांत मृत्यु पावलेल्या कैद्याचें कोणीहि नातेवाईक किंवा मित्र हजर नसेल आणि त्याचें शव ताब्यांत घेऊन त्याची व्यवस्था लावण्यास तयार नसेल तर तें पुरलें किंवा जाळलें पाहिजे किंवा अन्यथा त्याची विल्हेवाट लावली पाहिजे.

१६. कैद्याच्या मृत्युसमयीं किंवा त्यास मुक्त करते वेळीं, ज्या पक्षकाराच्या दाव्याअन्वयें अशा कैद्यास अटकावून ठेवलेलें असेल त्या पक्षकारानें दिलेल्या भत्त्यापैकीं कोणताहि भत्ता खर्च न झाल्यामुळें शिल्लक राहीला असेल तर, तो देणाऱ्या इसमास ताबडतोब नोटीस दिली पाहिजे, आणि अशी खर्च न झालेली शिल्लक त्या पक्षकारास किंवा त्याच्या प्रतिनिधीस परत दिली पाहिजे : कैद्याच्या मृत्युसमयीं किंवा त्यास मुक्त करतें-वेळीं शिल्लक राहिलेल्या भत्त्याची विल्हेवाट लावणें.

परंतु त्यानें किंवा त्यांनीं, अशा नोटीशीच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आंत तिची मागणी केली पाहिजे, अशी मागणी करण्यास तें चुकतील तर अशी शिल्लक राज्य सरकारची मालमत्ता होईल.

मृत्यु पावलेल्या कैद्याच्या शवाची व्यवस्था निकटपूर्वीच्या कलमाच्या कंडिका २ अन्वयें विल्हेवाट लावण्यांत जो खर्च आला त्या खर्चाची आणि आजारी कैद्यांच्या सोयीसाठीं केलेल्या खर्चाची, आणि, सामान्यतः दिवाणी तुरुंग सुव्यवस्थित राखण्यासाठीं करावयाच्या खर्चाची तरतूद, राज्य सरकार याबाबत वेळोवेळीं विहित करील अशा नियमांस अधीन राहून, राज्य सरकारनें केली पाहिजे. शवांची व्यवस्था लावण्याच्या खर्चाची आणि दिवाणी तुरुंगाशीं संबंधित असलेल्या इतर खर्चाची तरतूद राज्य सरकारनें करणें.

## विभाग ४ ते १४

(फौजदारी तुरुंग, फौजदारी तुरुंगांचे अधीक्षक, आणि त्यांचीं कर्तव्यें, तुरुंग अधिकारी आणि त्यांचीं कर्तव्यें, वैद्यकीय अधिकारी, तुरुंगांतील अपराध, तुरुंगांच्या संबंधांतील अपराध ; कैद्यांना भेट देणें आणि त्यांचा पत्रव्यवहार, कैद्याना मुक्त करणें ; तुरुंगांचे अवेक्षक, तुरुंगाबाहेरील टोळचा, संकीर्ण.

१७ ते ५२. [हीं कलमें सन १८९४ चा अधिनियम ९ अन्वयें रद्द करण्यांत आलीं.]